# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/९५
दिनांक : २१.०६.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**संदर्भ :** जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई शहर यांचे पत्र क्र.जिनिस/नशाबंदी मंडळ/२०२३, दिनांक २१.०६.२०२३

**विषय :** २६ जून २०२३ रोजी '' ड्रग्ज फ्री मुंबई अभियाना' च्या शुभारंभ प्रसंगी मुंबई शहर च्या प्रत्येक महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजनेचे १ कार्यक्रम अधिकारी यांच्या सह २ मुले व २ मुली यांना सहभागी करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार मुंबई शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी ''ड्रग्स फ्री मुंबई अभियान'' मोठ्या प्रमाणात राबविण्याची आणि प्रत्येक महाविद्यालयात ''युथ अगेन्स्ट ड्रग्स क्लब' स्थापन करण्याची सूचना मा. ना. श्री. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री मुंबई शहर यांनी केली आहे. मा. ना. श्री. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री मुंबई शहर यांच्या मार्गदर्शनाखाली ''ड्रग्स फ्री मुंबई अभियान'' मुंबई शहर जिल्ह्यात सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात येत असून सदर अभियान हे महिला व बालविकास विभाग,मुंबई शहर यांच्या सहयोगाने व शालेय विभाग, उच्च तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या सहभागाने राबविण्यात येत आहे. '' युथ अगेंस्ट ड्रग्ज क्लब'' प्रत्येक महाविद्यालयात प्रत्येकी १० मुले - १० मुली यांचा क्लब तयार करून महाविद्यालयातील परिसरांत विविध स्पर्धा, सेमिनार, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव इ. वार्षिक कार्यक्रम राबवुन मुंबई शहरातील प्रत्येक महाविद्यालयातून दरवर्षी हजारो प्रशिक्षित विद्यार्थांची फळी निर्माण करणे आहे.

सदर अभियानाचे मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांना प्रत्येक महाविद्यालयाचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त करायचे आहे. सदर अभियानाचा शुभारंभ सोहळा २६ जून २०२३ रोजी षण्मुखानंद सभागृह, माटुंगा, मुंबई येथे सकाळी १०.३० ते दुपारी ०२.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. सदर प्रसंगी प्रत्येक महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक

कार्यक्रम अधिकारी यांना मार्गदर्शक म्हणून सहभागी करावे. त्या मार्गदर्शक शिक्षकाचे नियुक्ती पत्र त्यांचे नाव, नंबर व ई-मेल सह आपल्या महाविद्यालयाच्या लेटर हेड वर नमूद करून द्यावे व सोबत 'युथ अगेन्स्ट ड्रग्ज क्लब' ची सभासद असलेले २ मुले व २ मुली सोबत घेऊन यावे. त्यांची नावे सुध्दा त्या पत्रात अंतर्भूत असावीत. सदर पत्र २६ जून च्या कार्यक्रमात घेऊन यावे. अशी सूचना संबंधित महाविद्यालयांना करण्यात यावी असे उपरोक्त पत्रात नमूद करण्यात आले आहे. कृपया यांची नोंद घ्यावी व योग्य ती कार्यवाही करावी.

**आपला,**

**श्री. सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

-Sd/-
**श्री. सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**

**प्रत :**

**मा.जिल्हाधिकारी,** जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांना माहितीसाठी सादर.

महाराष्ट्र शासन
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६६०१६७ ई-मेल : dpomumbaicity@gmail.com


---

जावक क्रमांक: जिनिस/नशाबंदी मंडळ/२०२३/ दिनांक - 21 / ०६ /२०२३

---

प्रति,
**मुख्य कार्यक्रम समन्वयक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**मुंबई विद्यापिठ**

विषय - २६ जून २०२३ रोजी "ड्रग्ज फ्री मुंबई अभियाना"च्या शुभारंभ प्रसंगी मुंबई शहर च्या प्रत्येक महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजनेचे १ कार्यक्रम अधिकारी यांच्या सह २ मुले व २ मुली यांना सहभागी करणेबाबत...

मुंबई शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अमली पदार्थापासून दूर ठेवण्यासाठी "ड्रग्स फ्री मुंबई अभियान" मोठ्या प्रमाणात राबविण्याची आणि प्रत्येक महाविद्यालयात "युथ अगेन्स्ट ड्रग्स क्लब" स्थापन करण्याची सूचना मा. ना. श्री. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री मुंबई शहर यांनी केली आहे. मा. ना. श्री. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री मुंबई शहर यांच्या मार्गदर्शनाखाली 'ड्रग्स फ्री मुंबई अभियान' मुंबई शहर जिल्ह्यात सन २०२३ - २०२४ या शैक्षणिक वर्षात राबविण्यात येत असून सदर अभियान हे महिला व बालविकास विभाग, मुंबई शहर यांच्या सहयोगाने व शालेय विभाग, उच्च तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या सहभागाने राबविण्यात येत आहे. "युथ अगेंस्ट ड्रग्ज क्लब" प्रत्येक महाविद्यालयात प्रत्येकी १० मुले - १० मुली यांचा क्लब तयार करुन महाविद्यालयातील परिसरांत विविध स्पर्धा, सेमिनार, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम, सण, उत्सव इ. वार्षिक कार्यक्रम राबवुन मुंबई शहरातील प्रत्येक महाविद्यालयातून दरवर्षी हजारो प्रशिक्षित विदयार्थांची फळी निर्माण करणे आहे.

सदर अभियानाचे मार्गदर्शक ( राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी ) हे प्रत्येक महाविद्यालयाचे एक प्रतिनिधी म्हणून नियुक्त करायचे आहे. सदर अभियानाचा शुभारंभ सोहळा २६ जून २०२३ रोजी षण्मुखानंद सभागृह, माटुंगा, मुंबई येथे सकाळी १०. ३० ते दुपारी ०२. ०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. सदर प्रसंगी प्रत्येक महाविद्यालयाचे एक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांना मार्गदर्शक म्हणून सहभागी करावे. त्या मार्गदर्शक शिक्षकाचे नियुक्ती पत्र त्यांचे नाव, नंबर व ई-मेल सह आपल्या लेटर हेड वर नमूद करून द्यावे व सोबत ' युथ अगेन्स्ट ड्रग्स क्लब' ची सभासद असलेले २ मुले व २ मुली सोबत घेऊन यावे. त्यांची नावे सुद्धा त्या पत्रात अंतर्भूत असावीत.सदर पत्र २६ जून च्या कार्यक्रमात घेऊन यावे. अशी सूचना संबंधित महाविद्यालयांना करावी.

(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी
मुंबई शहर

Received @ 21/06/2023